दिनांक - 08/08/2025

# प्रेस नोट

## "नांदेड जिल्ह्यातील मोबाईल मिसिंग मधील 20,53,000/- रुपयाचे 160 अँड्रॉइड मोबाईल हस्तगत सायबर शाखेची कामिगरी"

नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातुन महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरीता मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी वसंत सप्रे, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सायबर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार सायबर सेल नांदेड, स्थागुशा आणि जिल्ह्यातील सर्व पोस्टे यांचे पथक तयार करुन मिसिंग मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबविण्यात आली होती. नांदेड येथील पोलीस स्टेशन व स्थागुशा यांच्या पथकाने जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन नांदेड जिल्ह्यातील **एकूण 160 मोबाईल किंमत 20,53,000/-** रुपयाचे हस्तगत केले. त्यांचे आज एकत्रितरीत्या मा.पोलीस अधीक्षक साहेब यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शोध झालेल्या मोबाईलचे IMEI क्रमांकांची माहिती नांदेड पोलीस दलाचे "Nanded Police" या Facebook Page व Twitter वर टाकण्यात आली आहे. त्यापैकी नागरिकांनी आपल्या हरवलेल्या मोबाईलचा IMEI क्रमांक ओळखून सायबर पोलीस स्टेशन नांदेड येथून मोबाईल घेऊन जाण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव नांदेड, डॉ.अर्चना पाटील भोकर, गृह पोलीस उप अधीक्षक श्रीमती डॉ. आश्विनी जगताप, पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन सायबर पो.उप.नि. एम.बी. चव्हाण, पोलीस अमलदार राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, महेश बडगु, मपोकॉ कांचन कसबे, रेश्मा पठाण, शुभांगी जाधव, दावीद पिडगे, काशीनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, ज्ञानेश्वर यन्नावार, दिपक राठोड, राम शेंडगे यांनी पाडली आहे. मा.पोलीस अधीक्षक,नांदेड यांनी CEIR पोर्टलवर गहाळ मोबाईलची माहिती अपलोड करण्याचे आवाहन केले आहे.

सदर कामगीरी बाबत मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सर्व पथकाचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी<br>
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड.